ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स, व्ही.आय.पी.रोड, नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक २७३ • बुधवार दि.२९ जुलै २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## मांडवी रुग्णालयातील ३.२० कोटीच्या अपहार प्रकरणी गुन्हा दाखल

### जिल्हा कोषागार अधिकाऱ्यांच्या सतर्कतेने प्रकरणाला वाचा फुटली



किनवट/प्रतिनिधी-मांडवी येथील ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी तथा प्रभारी आहरण व संवितरण अधिकारी डॉ.विक्रम दासराव राठोड यांनी बनावट देयके तयार करून शासनाची तब्बल ३ कोटी २० लाख ९९ हजार ९५३ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध मांडवी पोलीसात गुन्ह्याची नोंद करण्यात आलीय. नांदेडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय माणिकराव पेरके यांच्या फिर्यादीवरून २८ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ४ जुलै २०२४ पासून १३ ऑक्टोबर २०२५ या काळात केलेल्या भ्रष्टाचाराची पोलखोल आज चव्हाट्यावर आली आहे. उल्लेखनीय म्हणजे नांदेडच्या जिल्हा कोषागार अधिकाऱ्यांच्या सतर्कतेमुळे हा घोटाळा बाहेर आलाय. मात्र चक्रावून टाकणारा घोटाळा किनवट तालुका कोषागार अधिकाऱ्यांच्या लक्षात का आला नाही? हाही एक चौकशीचा विषय होऊ शकतो अशा प्रतिक्रिया उमटायला सुरूवात झाली आहे.

प्राप्त माहितीनुसार मांडवी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.एन.जी.लोकडे हे सेवा निवृत्त झाल्यानंतर ३१ मे २०२३ पासून या पदाचा अतिरिक्त कार्यभार आहरण व संवितरण अधिकारांसह डॉ. विक्रम राठोड यांच्याकडे सोपवण्यात आला होता. कोषागारातून शासकीय निधी काढणे व वितरीत करणे ही त्यांची जबाबदारी होती. माहे जून २०२४ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत सेवार्थ प्रणालीचा डेटा प्रणालीवरून नवीन प्रणालीत मायग्रेट करताना डॉ.राठोड यांनी वेतनाची चुकीची नोंद केली. स्वतःच्या फायद्यासाठी बेसिक एरीअर्स (थकबाकी) पोटी ३ कोटी २० लाख ९९ हजार ९५३ रुपयांची बेकायदेशीर देयके तयार करून ती उपकोषागार कार्यालय किनवट येथे सादर केली. ही सर्व रक्कम त्यांनी स्वतःच्या वैयक्तिक बँक खात्यावर वर्ग करून घेतली होती हे विशेष. जिल्हा कोषागार अधिकारी नांदेड पान ४ वर

## दमदार पावसाने नांदेडकरांना दिलासा

नांदेड/प्रतिनिधी-यावर्षीच्या पावसाळ्यात जुलै अखेर पर्यंत केवळ ढगाळ वातावरण आणि प्रचंड उकाड्यामुळे त्रस्त झालेल्या नांदेडकरांना गेल्या दोन दिवसांपासून सुरु असलेल्या दमदार पावसाने मोठा दिलासा दिला आहे.

यावर्षी मराठवाड्यात आणि विशेष करुन नांदेड जिल्ह्यात पावसाने दडी मारली होती. त्यामुळे पेरण्या खोळंबल्या होत्या. मध्यंतरी झालेल्या थोड्याशा पावसानंतर अनेक शेतकऱ्यांनी पेरणी उरकुन घेतली. परंतु पावसाने पुढे दडी मारल्याने दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर घोघांवत होते. तर शहरी भागातील नागरिक ढगाळ वातावरण व प्रचंड उकाड्यामुळे त्रस्त झाले होते. मागच्या आठवड्यात अनेक ठिकाणी कमी-जास्त प्रमाणात पाऊस झाला. परंतु दमदार पावसाची वाट शेतकऱ्यांसह सर्वचजण पाहत होते. सोमवारी संध्याकाळपासून नांदेड परिसरात रिमझिम पाऊस सुरु झाला आहे. मंगळवारी रात्रीपासून सुरु झालेल्या पावसाने आज बुधवारी दुपारपर्यंत विश्रांती घेतली होती. दुपारी पुन्हा पावसाच्या सरी बरसू लागल्याने सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

## कर्जमाफी लाभासाठी बँकांच्या त्रुटी दूर करा-कृषीमंत्री भरणे

### लाभ न मिळालेल्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करावी शासनाचे निर्देश

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील दोन लाख रुपयांपर्यंत थकीत पीककर्ज असलेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीचा लाभ दिला जाणार आहे. कर्जमाफीच्या यादीत काही शेतकऱ्यांच्या खात्यात कमी रक्कम दिसत असली तरी घाबरण्याचे कारण नसून पात्र लाभार्थ्यांना पूर्ण न्याय दिला जाईल, अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बुधवारी दिली. दरम्यान पात्र असूनही कर्जमाफीचा लाभ न मिळाल्यास किंवा नाव, खाते क्रमांक, रक्कम आदी तपशीलात त्रुटी असल्यास जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीकडे तक्रार करण्याचे आवाहन सहकार विभागाने केले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेत राज्यातील ५६ लाख शेतकरी या योजनेच्या कक्षेत असून त्यापैकी ३२ लाख शेतकरी कर्जमाफी व एकवेळ तडजोड (ओटीएस) योजनेसाठी, तर २४ लाख



शेतकरी प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र आहेत. पहिल्या टप्प्यात १६ लाख ९६ हजार २०१ शेतकऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. उर्वरित लाभार्थ्यांचे प्रमाणीकरण आणि इतर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढील यादी प्रसिद्ध केली जाणार असल्याचे कृषिमंत्री भरणे यांनी सांगितले. कर्जमाफीच्या अंमलबजावणी दरम्यान विशेषतः राष्ट्रीयीकृत बँकांमधील ई-केवायसी प्रक्रिया, मूळ कर्ज, व्याज आणि थकबाकीतील तफावत याबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे संबंधित बँकांनी शेतकऱ्यांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश शासनाने दिले आहेत. सहकार आयुक्तांनी सांगितले की, राष्ट्रीयीकृत व व्यावसायिक बँकांकडील अनेक कर्जखात्यांमध्ये ३१ मार्च २०२६ पर्यंतची थकबाकी दिसण्याऐवजी तडजोडीची (ओटीएस) रक्कम दिसत आहे. ही रक्कम दोन लाखांपेक्षा कमी असल्याने अनेक शेतकरी कर्जमाफी अपूर्ण झाल्याचा समज करून घेत आहेत. अशा शेतकऱ्यांनी संबंधित बँक शाखेत जाऊन कर्जमाफी पोर्टलवरील शिल्लक रक्कम तपासावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



गुरु पौर्णिमेनिमित्त आज शहरातील सोमेश कॉलनी येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात श्री स्वामी समर्थनांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी सकाळपासूनच मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

## कुणबी प्रमाणपत्रासाठी २९ ऑगस्टपासून निर्णायक लढा

### मनोज जरांगे पाटलांचा राज्य सरकारला इशारा



जालना: हैदराबाद गॅझेटनुसार ५८ लाख कुणबी नोंदी सापडलेल्या मराठा बांधवांना २८ ऑगस्टपर्यंत जातप्रमाणपत्रे देण्यात यावीत, अन्यथा २९ ऑगस्टपासून तडजोड न करता निर्णायक लढा उभारला जाईल असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. आज ते अंतरवाली सराटी येथील सभेत बोलत होते.

मराठा आरक्षणाच्या लढ्याला २९ ऑगस्ट रोजी तीन वर्षे पूर्ण होत असल्याचे सांगत जरांगे पाटील यांनी सरकारवर समाजाची दिशाभूल केल्याचा आरोप केला. हैदराबाद गॅझेट लागू झाल्यानंतरही पात्र मराठा बांधवांना प्रमाणपत्रे न देणे हा अन्याय असल्याचे ते म्हणाले. मराठा समाजाला जाणीवपूर्वक वेड्यात काढले जात आहे. समाजातील विद्यार्थी आणि तरुणांचे भवितव्य धोक्यात आले असून, त्यांच्या हक्कासाठी गेली तीन वर्षे संघर्ष सुरू आहे. सरकारने स्थानिक चौकशी अहवाल स्वीकारला, तरीही मराठा समाजालाच लक्ष्य केले जात आहे, अशी टीका त्यांनी केली. २९ ऑगस्टपासून होणारे आंदोलन हे मराठा आरक्षणाच्या लढ्यातील शेवटचे आणि निर्णायक आंदोलन असेल, त्यामुळे समाजातील एकाही व्यक्तीने घरी न थांबता आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच, ज्या मराठा बांधवांच्या कुणबी नोंदी उपलब्ध झाल्या आहेत, त्यांनी तातडीने जातप्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याचे आवाहनही त्यांनी केले. राजकीय नेत्यांनाही त्यांनी यावेळी लक्ष्य केले. आज अनेक नेत्यांच्या मुलांना आरक्षणाची गरज पान ४ वर

## विद्यार्थ्यांवर कारवाईचे आदेश गृहमंत्रालयाने दिले

### राहुल गांधींच्या आरोपानंतर भाजपचा जोरदार गदारोळ

नवी दिल्ली:विद्यार्थ्यांच्या आंदोलना दरम्यान पोलिसांना कारवाईचे आदेश थेट गृहमंत्रालयाकडून देण्यात आल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला. त्यांच्या या वक्तव्यानंतर सत्ताधारी सदस्यांनी तीव्र आक्षेप घेत पुरावे सादर करण्याची मागणी करत भाजप खासदारांनी सभागृहात प्रचंड गदारोळ केला. त्यामुळे लोकसभेचे कामकाज दुपारपर्यंत तहकूब करावे लागले.



नीटसह देशातील विविध स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटीविरोधातील कायदा दुरुस्ती विधेयकावर लोकसभेत सुरू असलेल्या चर्चेदरम्यान बुधवारी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर गंभीर आरोप करत सभागृहात खळबळ उडवून दिली. राहुल गांधी यांनी आपल्या भाषणात विद्यार्थी आंदोलनाचा संदर्भ देत, देशाचे भविष्य रस्त्यावर उतरले होते. तो राग नव्हता, द्वेष नव्हता आणि हिंसाही नव्हती; तो देशातील तरुणांचा आवाज होता, असे सांगितले. जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलनाचा उल्लेख करत त्यांनी विद्यार्थ्यांच्या भावना समजून घेण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी विद्यार्थी, मूर्ख आणि अंधभक्त या शब्दांचा उल्लेख करत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शिक्षण संस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही केला. या वक्तव्यावर सत्ताधारी खासदारांनी तीव्र आक्षेप घेत राहुल गांधी असंसदीय भाषा वापरत असल्याचा आरोप केला. सभागृहात घोषणाबाजी सुरू झाल्याने वातावरण चांगलेच तापले. राहुल गांधी यांनी पुढे सांगितले की, शिक्षणाचा वाढता खर्च, परीक्षा पान ४ वर

## कोळसा खाण प्रकरणात सर्व दोषमुक्त

### सुप्रीम कोर्टाचा महत्वपूर्ण निकाल;डॉ.मनमोहनसिंघ यांना अखेर न्याय



नवी दिल्ली:देशभर गाजलेल्या कोळसा खाण वाटप प्रकरणी सीबीआयने दाखल केलेल्या क्लोजर रिपोर्ट स्विकारत सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणातील सर्वांना दोषमुक्त केले आहे. देशाचे माजी पंतप्रधान दिवंगत डॉ.मनमोहनसिंघ यांच्यावरील कोळसा घोटाळ्यातल्या भ्रष्टाचाराच्या आरोपावर अखेर पडदा पडला आहे.

देशभरात गाजलेल्या कोळसा खाण वाटप (कोल ब्लॉक) प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी महत्त्वपूर्ण निकाल देत माजी पंतप्रधान दिवंगत डॉ. मनमोहन सिंग यांच्यावरील सर्व आरोपांवर अखेरचा पडदा टाकला. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) सादर केलेला क्लोजर रिपोर्ट सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारत विशेष न्यायालयाचा तो फेटाळण्याचा आदेश रद्द केला. भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने न्यायमूर्ती जोयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या समवेत हा निर्णय दिला. सीबीआयने सादर केलेला क्लोजर रिपोर्ट फेटाळण्यासाठी विशेष न्यायालयाकडे कोणताही ठोस कायदेशीर आधार नव्हता, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने ट्रायल कोर्टाचा आदेश रद्दबातल ठरविला. न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केले की, सीबीआयचा क्लोजर रिपोर्ट नाकारून प्रकरणाची दखल घेण्याचे कोणतेही सबळ कारण नव्हते. त्यामुळे क्लोजर रिपोर्ट स्वीकारत हे प्रकरण कायमचे बंद करण्यात येत आहे. डॉ. मनमोहन सिंग यांचे डिसेंबर रोजी निधन झाले होते. त्यांच्या निधनानंतर सुमारे दीड वर्षांनी आलेल्या या निकालामुळे त्यांच्या नावावरील कोळसा खाण वाटप प्रकरणातील आरोपांचा शेवट झाला आहे. सुनावणी दरम्यान डॉ. मनमोहन सिंग यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल आणि अभिषेक मनू सिंघवी यांनी बाजू मांडली. माजी पंतप्रधानांच्या प्रतिमेवर कोणताही डाग राहू नये. त्यांच्या विरोधातील आक्षेपार्ह निरीक्षणे पूर्णपणे हटवावीत, अशी मागणी कपिल सिब्बल यांनी न्यायालयाकडे केली. या प्रकरणात यापूर्वी १ एप्रिल २०१५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने विशेष न्यायालयाने बजावलेल्या



समन्सला स्थगिती दिली होती. हिंदाल्को कंपनीला कोळसा खाण वाटपाचा निर्णय हा प्रशासकीय स्वरूपाचा होता आणि त्यामध्ये कोणताही गुन्हेगारी हेतू नव्हता, असा युक्तिवाद बचाव पक्षाने केला होता. सीबीआयने दोन वेळा क्लोजर रिपोर्ट सादर करूनही पान ४ वर

## मांडवीतील ग्रामीण रुग्णालयाची धुरा डॉ.घडसिंग यांच्याकडे-डॉ.संजय पेरके

मांडवी/प्रतिनिधी-येथील बळीराम पाटील ग्रामीण रुग्णालयाचे प्र.वैद्यकीय अधीक्षक डॉ. विक्रम राठोड यांच्यावर ३ कोटी २० लाख रुपयांच्या आर्थिक अपहाराप्रकरणी २८ तारखेला मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या कारवाईनंतर रुग्णालयाचा कारभार कोणाकडे सोपवला जाणार, याविषयी नागरिकांमध्ये उत्सुकता लागली होती. अखेर या रुग्णालयाचा अतिरिक्त पदभार गोकुंद्रा (किनवट) येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. घडसिंग यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. जिल्ह्याच्या शेवटच्या टोकाला असलेल्या या रुग्णालयातील आरोग्य व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी स्वतः पुढाकार घेतला आहे. 'आम'च्या प्रतिनिधीशी बोलताना डॉ. पेरके यांनी सांगितले की, मांडवी येथील रुग्णालयाच्या कारभारावर मी स्वतः जातीने लक्ष ठेवणार असून स्थानिक नागरिकांच्या आरोग्याच्या सर्व समस्या तात्काळ सोडवण्यात येतील. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.पेरके यांनी गेल्या दोन दिवसांत मांडवी ग्रामीण रुग्णालयाला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली. रुग्णालयात येणाऱ्या पान ४ वर

# स्पर्धा परीक्षांच्या विश्वासावरील संकटकाळ

**स्पर्धा परीक्षा म्हणजे गुणवत्तेच्या आधारे संधी मिळवून देणारी व्यवस्था. लाखो विद्यार्थी दिवस-रात्र अभ्यास करतात, पालक कष्टाने पैसा खर्च करतात आणि आपल्या मुलांच्या उज्ज्वल भवितव्याची स्वप्ने पाहतात. परंतु अलीकडच्या काळात एकामागून एक समोर येणाऱ्या घटनांमुळे ही व्यवस्था खरोखर गुणवत्तेवर चालते की पैशांच्या बळावर?, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. या घटनांमुळे केवळ काही विद्यार्थ्यांचे नुकसान होत नाही, तर संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवरील समाजाचा विश्वास डळमळीत होतो. अलीकडे एमएस-सीआयटी परीक्षेबाबत काही गंभीर आरोप चर्चेत आले आहेत. या परीक्षेत जुळ्या भाऊ-बहिणीला एकही गुण कमी-जास्त न होता समान गुण मिळाल्याची बाब अनेकांच्या चर्चेचा विषय ठरली आहे. योगायोग असू शकतो, असे म्हणता येईल; परंतु जेव्हा त्याच वेळी परीक्षेच्या प्रक्रियेवर विविध प्रकारचे आरोप होत असतात, तेव्हा अशा घटनांमुळे संशय अधिकच गडद होतो. अशा प्रत्येक प्रकरणाची तांत्रिक आणि स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक आहे. संशय दूर करण्याची जबाबदारी परीक्षा घेणाऱ्या संस्थेची असते.याचबरोबर काही क्लासेस चालक आणि पालक यांच्यात विद्यार्थ्यांचे गुण वाढवून देण्याच्या नावाखाली व्यवहार होत असल्याचे आरोपही समोर आले आहेत. यापेक्षाही गंभीर म्हणजे काही ऑडिओ क्लिपमध्ये सरकारी अभियांत्रिकी महाविद्यालयात हमखास प्रवेश मिळवून देण्यासाठी १२ ते १५ लाख रुपयांपर्यंत व्यवहार झाल्याचा दावा करण्यात येत आहे. या ऑडिओ क्लिपची सत्यता तपासणे हे तपास यंत्रणांचे काम असले, तरी अशा स्वरूपाचे आरोप सार्वजनिक चर्चेत येणे हीच शिक्षण व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे. जर गुणवत्तेपेक्षा पैशांना अधिक महत्त्व मिळत असेल, तर मेहनती विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचे काय? दरम्यान, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पदाच्या भरती परीक्षेबाबतही पेपरफुटीची शक्यता व्यक्त केली जात आहे. या आरोपांमध्ये कितपत तथ्य आहे, हे अधिकृत चौकशीतूनच स्पष्ट होईल. मात्र प्रत्येक भरती प्रक्रियेनंतर पेपरफुटी, गैरव्यवहार, गुणांतील विसंगती किंवा न्यायालयीन वाद समोर येऊ लागले, तर स्पर्धा परीक्षांवरील लोकांचा विश्वास उडणे स्वाभाविक आहे.यातील प्रत्येक आरोप अंतिम सत्य आहे, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. दोषी कोण, हे न्यायालय आणि तपास यंत्रणाच ठरवतील. मात्र गंभीर आरोप होत असताना संबंधित संस्था आणि शासनाने मौन बाळगणेही तितकेच घातक आहे. चौकशी पारदर्शक, वेळबद्ध आणि निष्पक्ष झाली पाहिजे. आरोप निराधार असतील तर तेही स्पष्ट झाले पाहिजे; आणि आरोप सिद्ध झाले तर दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. शिक्षण क्षेत्रात कोणालाही अभय मिळता कामा नये.आज विद्यार्थ्यांचा संघर्ष केवळ अभ्यासापुरता मर्यादित राहिलेला नाही. परीक्षा दिल्यानंतर निकालावर विश्वास ठेवायचा की नाही, मेरिट यादीत आपले नाव असेल की नाही, प्रवेश प्रक्रियेत अन्याय होणार नाही ना, अशा अनेक प्रश्नांनी विद्यार्थी आणि पालक त्रस्त झाले आहेत. हा मानसिक ताण कोणत्याही सुसंस्कृत समाजासाठी योग्य नाही.स्पर्धा परीक्षा या देशाच्या गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाचा पाया आहेत. त्या पायालाच तडे जाऊ लागले, तर त्याचे दूरगामी परिणाम देशाच्या प्रशासनावर, आरोग्य व्यवस्थेवर, तंत्रज्ञानावर आणि एकूणच सामाजिक विश्वासावर होतील. त्यामुळे प्रत्येक परीक्षा प्रक्रिया अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक सुरक्षित करणे, स्वतंत्र लेखापरीक्षण करणे, तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करणे आणि प्रत्येक संशयास्पद घटनेची निष्पक्ष चौकशी करणे ही काळाची गरज आहे.मेहनती विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी कोणताही तडजोडीचा खेळ होऊ नये. मेरिट ही विक्रीची वस्तू नसून कष्टाचे आणि प्रामाणिकपणाचे प्रतीक आहे. त्यामुळे स्पर्धा परीक्षांवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित करायचा असेल, तर शासन, परीक्षा संस्था आणि तपास यंत्रणांनी कोणताही दबाव न स्वीकारता सत्य जनतेसमोर आणले पाहिजे. कारण लोकशाहीत न्याय केवळ झाला पाहिजे असे नाही, तर तो होताना दिसलाही पाहिजे.**

# चांगले मार्गदर्शन, प्रेरणा व संस्कार देणारा प्रत्येक व्यक्ती आपला 'गुरू'

प्राचीन काळापासून गुरूच्या स्मरणार्थ आषाढ महिन्यातील पौर्णिमासाजरी करण्याची परंपरा गेल्या ५ हजार वर्षांपूर्वीची आहे.त्यामुळेच भारतात गुरूपौर्णिमेला आगळेवेगळे महत्व असल्याचे आपल्याला दिसुन येते.गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने सर्वांनीच गुरू या शब्दाचा मान-सन्मान करने अत्यंत गरजेचे आहे.कारण गुरू शिवाय ज्ञान नाहीही म्हण सत्य आहे.गुरू पौर्णिमेचे महत्व जाणून चांगले विचार आचरणात आणायला हवे. गुरूचे महत्व म्हणजे ज्यांच्यापासुन आपल्याला चांगल्याप्रकारची चालना,गुण, शिक्षण, प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रेम,आपुलकी, प्रेरणा, संस्कार जिव्हाळ्याच्या गोष्टी इत्यादींचे जो व्यक्ती चांगले आणि महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करतो तोच आपला खरा गुरु समजायला पाहिजे.आई-वडिल हे गुरू या परीभाषेपेक्षाही महान आणि मोठे आहेत.जो पर्यंत सुर्य-चंद्र-आकाश-पाताळ आहे तोपर्यंत आई-वडीलांचा मान गुरू पेक्षाही महान आहे आणि राहील यात दुमत नाही.कारण आई-वडीलांसमोर सर्वच नतमस्तक होतात आणि व्हायला हवे.

संपूर्ण सृष्टी पृथ्वी मातेसमोर नतमस्तक होते.आई मायेचे पांघरूण घालुन मुला-मुलींना लहानाचे मोठे करते तर वडील संपूर्ण कुटुंबाची ढाल बनून कुटुंबाचे रक्षण करण्याचे काम करीत असतो. त्यामुळे आपण नेहमी पहातो की छोटी दुर्घटना घडली तर आपण आईग म्हणुन आईला हाक मारतो यावेळी आईच्या रूपात सर्वच धावुन येतात.यामुळे आपले दु:ख कमी होते.त्याच्या विपरीत जर मोठी घटना घडली तर आपण बापरे म्हणतो.यावेळेस संपूर्ण गाव जमा होवुन वडिलांच्या रूपात धावुन येतो.अशाप्रकारे आई-वडीलांचे नाते किती महान व अनभिज्ञ आहे हे जगात दिसून येते. म्हणजेच या जगात जो आपले पालन-पोषन करतो तो आपला सर्वात मोठा गुरू आहे. वडिलांचे नाते किती महान आहे हे आपण समजू शकतो.त्याचप्रमाणे आपण नेहमी पहातो की आई- वडीलांचा अपमान कोनीही सहन करीत नाही आणि करणार नाही.अशा परिस्थितीत मुलं-मुली तुटून पडतात.यात खरे गुरु-शिष्याचे नाते दिसून येते.म्हणजेच जगाच्या पाठीवर सर्वात मोठे गुरू-शिष्याचे नाते म्हणजे आई-वडिलच!यात मोठा वाटा म्हणजे आई-वडीलांचे मुलांवरील संस्कार व मार्गदर्शन.यातुनच गुरू-शिष्याचा जन्म झाला.आई गुरूची भुमिका बजावुन वटवृक्षाच्या अफाट सावलीत मुलांची जोपासना करते तर वडील याच वटवृक्षाचा पहारेकरी बनुन परिवाराचे जतन व संरक्षण करते व पहाडासारखा उभा रहातो.मानसाच्या आयुष्यात अनेक उतारा-चढाव येतात, कठीण समस्या येतात, सुख-दु:खाच्या घटना घडतात. याकरीता वेगवेगळ्या मार्गदर्शनासाठी प्रत्येकाला गुरूची आवश्यकता असते.कारण गुरू शिवाय संपूर्ण मार्ग अधुरा असतो.आपण शिक्षणाच्या क्षेत्रात जेव्हा पाय ठेवतो.तेव्हा शिक्षक आपला गुरुच असतो. कारण पुढील आयुष्याचे खरे मार्गदर्शन आपल्याला शिक्षकांपासुन मिळत असते.आपण शाळेतल्या पहिल्या पायरीपासुन तर शेवटच्या पायरीपर्यंत म्हणजे अंतीम शिक्षणापर्यंत शिक्षक आपला गुरूच असतो.कारण यांच्या पासुनच आपल्या बुध्दीमत्तेचा आणि पुढील वाटचालीचा मार्ग मोकळा होतो व आपल्याला पुढील दिशा आणि मार्ग दिसून येतात.त्याचप्रमाणे क्रीडाक्षेत्रात पदार्पण करतांना गुरूची



अत्यंत आवश्यकता असते.कारण संपूर्ण क्रीडाक्षेत्राचे भवितव्य आपल्या गुरू विद्येवर अवलंबून असते.त्यामुळे आपण क्रीडाक्षेत्रात नेहमी पहातो की कुशलता, कर्तबगारी, उत्कृष्ट खेळाडू आणि पराक्रमी खेळाडू तयार करतांना गुरू- शिष्याची संपूर्ण कसोटी लावून आपली ताकद झोकल्या जाते. तेव्हाच पीटी उषा, कपिल देव, तेंडुलकर, दारासिंग,खली, मिल्खासिंग, मेजर ध्यानचंद,निरज चोपडा असे अनेक नामांकित व महान खेळाडू गुरूमुळेच तयार झाले आणि होतात सुध्दा. गुरूच्या परीक्षेत जो-जो पास होतो.तीच शिष्यांकडून गुरू दक्षिणा असते.आपण महाभारत ते रामायणमध्ये गुरू-शिष्याचे काय नाते असते ते आपण जाणतोच. व्दापरयुग,सत्ययुग,कलयुग किंवा कोणतेही युग असो गुरू शिवाय पुढचा मार्ग निघने अवघड असते.याकरीता गुरूची आवश्यकता असने गरजेचे असते.राजकीय क्षेत्राचा विचार केला तर यातही आपल्याला गुरू-शिष्याचे नाते दिसून येते.यातुन राजकीय पुढारी तयार होतात.आपण पारतंत्र्यात असतांना स्वतंत्र लढा जिंकण्यासाठी क्रांतीकारकांनी आपल्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र्याचा लढा उभा केला.त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात राहून मोकळा स्वास घेवु शकतो. कारण क्रांतीकारकांना गुरूचे मार्गदर्शन योग्य लाभले त्यामुळेच क्रांतिकारक शिष्यांनी भारताला स्वतंत्र मिळवून दिले.त्यामुळे गुरू शिवाय कोणतेही काम होने शक्य नाही. याकरीता कोणतेही क्षेत्र असो अनुभव,ज्ञान,माहीती मिळवण्यासाठी गुरूची तेवढीच आवश्यकता असते.म्हणुनच म्हटल्या जाते गुरू बिना ज्ञाण अधुरा. त्याचप्रमाणे आपण पुजाअर्चना करतो याचे मुख्य कारण म्हणजे एकाग्रता निर्माण व्हावी.आपण आपले काम फत्ते व्हावे याकरिता देवी-देवता व पुर्वजांची पुजाअर्चना करतो.कारण आपण केलेल्या कार्याला यश प्राप्त झाले पाहिजे.भारत भुमित गौतम बुद्ध, ऋषीमुनी, त्यागी, साधुसंत,थोरमहात्मे, होवुन गेले.याच्याच पाऊलावर पाऊल ठेवून योगा व व्यायामाच्या मदतीने आपले शरीर सुदृढ आणि निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतो.त्यामुळे आज भारताला योगाच्या बाबतीत विश्व गुरू म्हणुन संबोधल्या जाते. त्याचप्रमाणे भारताला विश्व शांतीचा गुरू सुध्दा संबोधल्या जाते.कारण जगाच्या पाठीवर शांतीपूर्ण देश म्हणजे भारताची जगात प्रचीती आहे.म्हणजेच आज भारत विश्व शांतीचा गुरू असल्याचे दिसून येते.ह्या संपूर्ण घटनांचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, परंपरा, संपूर्ण धर्माची जोपासना यामुळेच भारताला विश्व गुरू म्हणून संबोधल्या जाते.गुरू पोर्णिमेच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की मुलांनी आई-वडीलांच्या सेवेला,त्यांच्या आज्ञेला व त्यांनी सांगितलेल्या कामाला प्रथम प्राधान्य देवून गुरू-शिष्याच्या नात्याची जोपासना सर्वांनीच केली पाहिजे.आताही भारतात गुरू शिष्याचे नाते अतूट आहे व टिकुन आहे याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, भारतातील अनेक धर्म,जाती-पंथ यांचा एकत्रितपणा यामुळेच आपल्याला गुरु-शिष्याचे नाते अधिक घनिष्ठ असल्याचे दिसून येते.शिष्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ज्यांच्या पासून आपण प्रेरणा घेतो,त्याची अवहेलना कुठेही होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे.यातच शिष्यांची महानता दिसून येईल.गुरू पौर्णिमेबद्दल एक गोष्ट सांगु इच्छितो की,परीवारापेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही, वडिलांपेक्षा श्रेष्ठ सल्लागार नाही,आई पेक्षा श्रेष्ठ जग नाही,भावापेक्षा श्रेष्ठ भागीदार नाही,बहीनी पेक्षा श्रेष्ठ शुभचिंतक नाही,मित्राशिवाय आयुष्य नाही यात आपल्याला गुरूचा गोडवा कीती महान आहे ते आपल्याला स्पष्ट दिसून येते.म्हणजेच प्रत्येक परीवार गुरूची भुमिका आप-आपल्या परीने पार पाडत असते.त्याचप्रमाणे सर्वांनीच एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की गुरू-शिष्याच्या नात्याला कोणीही कलंकित करणार नाही याचीही काळजी सर्वांनीच घेणे गरजेचे आहे. कारण गुरू-शिष्याच्या नात्यानेच आपण घडतो आणि घडवितो, आपला परिवार घडते व यातुनच देश घडतो.आई माझा गुरु,आई कल्पतरू, सुखाचा सागरू,आई माझी प्रीतीचे माहेर, शांतीचे आगार, मांगल्याचे सार आई माझी. गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने मी सर्वांना विनंती करतो की बदलते हवामान व देशातील वाढते प्रदुषण,ऑक्सिजनचे कमी होत असलेले प्रमाण आणि ग्लोबल वॉर्मिगमुळे वाढणारा धोका रोखण्यासाठी प्रत्येकांनी आपल्या परिसरात किंवा घरी वृक्षारोपण केले पाहिजे.ज्याच्या परिसरात जागा नसेल त्यांनी एखाद्या कुंडीमध्ये झाड लावुन वृक्षारोपण करायला हवे.कारण वाढते प्रदुषण मानव, जिवजंतू, वन्यप्राणी यांच्यासाठी अत्यंत धोकादायक स्थितीत आहे.त्यामुळे गुरू पोर्णिमेचे औचित्य साधून वृक्षारोपणावर भर दिला पाहिजे व पृथ्वी मातेचे रक्षण केले पाहिजे.गुरूपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

रमेश लांजेवार
नागपूर

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३ ०२४६६ दिनांक - २१/०७/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार केशव गोविंद हिप्परगे रा.भंडारकुमटयाचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.गोविंद भुजंगा हिप्परगे रा.भंडारकुमटयाचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव गोविंद भुजंगा हिप्परगे रा. भंडारकुमटयाचीवाडी ता.कंधार या ठिकाणी दिनांक १६/०५/२०२४ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १७/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- २१/०७/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३ ०२४६६ दिनांक - ०३/०७/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार स्वप्निल हाणमंत वाघमारे रा.शिरुर ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.स्वप्निल हाणमंत वाघमारे रा.शिरुर ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव स्वप्निल हाणमंत वाघमारे रा. शिरुर ता.कंधार या ठिकाणी दिनांक २२/१२/२००७ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ३०/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०३/०७/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२५/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - ११/१२/२०२५

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार माणिक व्यंकटी गंद्रेवाड रा.बिंडा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.माणिक व्यंकटी गंद्रेवाड रा.बिंडा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव माणिक व्यंकटी गंद्रेवाड सदर व्यक्तीचा मौ.बिंडा ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०९/०६/१९९७ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १०/१२/२०२५ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- १२/१२/२०२५
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३ ०२४६६ दिनांक - १६/०७/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार धनंजय रामचंद्र कल्याणकर रा.गोगदरी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.धनंजय रामचंद्र कल्याणकर रा.गोगदरी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव धनंजय रामचंद्र कल्याणकर रा.गोगदरी ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०१/११/२००६ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १५/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- १६/०७/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

CHANGE IN NAME

My (old name) is **SHAHANA GAZAL D/O SYED RAZIYUDDIN SHAHANA GAZAL AYFAN BA AMAR** which now I am changing As new name **SHAHANA GAZAL AYFAN BA AMAR** my all correspondance Will be done As my new name please consider the same.

Address
Near ameer hamza masjid
Barkat pura waghi Road Nanded.
Mob.8983838033

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २९/०७/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार सय्यद इमरान सय्यद एकबाल रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा मुलगी सय्यद माहीन सय्यद इमरान रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव मुलगी सय्यद माहीम सय्यद इमरान रा.कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०१/०५/२०१८ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २९/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३ ०२४६६ दिनांक - १६/०७/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार उमाजी रामराव नरवड रा.आनंदवाडी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.बालाजी उमाजी नरवड रा.आनंदवाडी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव बालाजी उमाजी नरवड रा.आनंदवाडी ता.कंधार या ठिकाणी दिनांक २६/१०/२००९ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १५/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- १६/०७/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# प्रारूप मतदार यादी प्रसिद्धी प्रक्रिया स्थगित

## ग्रामपंचायत निवडणुका लांबणीवर? ;इच्छुकांचा हिरमोड

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकांची तयारी करणाऱ्या इच्छुक उमेदवारासह ग्रामस्थांना मोठा धक्का बसला आहे. राज्य निवडणूक आयोगाने मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकांसाठी २४ जुलै रोजी प्रसिद्धी होणारी प्रभाग निहाय प्रारूप मतदार यादी स्थगित करण्याचा निर्णय घेतल्याने देगलूर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुका लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आता आयोगाच्या सुधारित वेळापत्रकांची प्रतीक्षा लागली आहे.

राज्य निवडणूक ग्रामपंचायत निवडणूक आयोगाने यापूर्वी जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार २४ जुलै रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करून त्यावर हरकती व सूचना स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू होणार होती. त्यानंतर प्राप्त हरकतीची छाननी करून चार ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र आयोगाने कोणतेही नवीन वेळापत्रक जाहीर न करता प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया स्थगित झाली आहे.देगलूर तालुक्यातील काही ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपल्याने निवडणुकीची तयारी सुरू होती. इच्छुकांनी प्रचाराची रणनीती आखण्यास सुरुवात केली होती. मतदार यादी, प्रभाग निहाय आरक्षण, उमेदवारीची तयारी आणि स्थानिक पातळीवरील राजकीय हालचाली नाही वेग आला होता. मात्र आयोगाच्या निर्णयामुळे या सर्व हालचालींना अचानक ब्रेक लागला आहे. त्यामुळे सुधारित वेळापत्रक कधी जाहीर होणार आणि निवडणुकीचा कार्यक्रम कधी निश्चित होणार, याबाबत सर्वांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. सुधारित वेळापत्रक जाहीर झाल्यानंतरच पुढील प्रक्रिया सुरू होणार असून, त्यानंतरच अंतिम यादी, निवडणूक कार्यक्रम आणि मतदानाच्या तारखा निश्चित केल्या जाणार आहेत. दरम्यान देगलूर तालुक्यातील इच्छुक उमेदवार, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांनी ग्रामस्थांचे लक्ष आता राज्य निवडणूक आयोगाच्या पुढील निर्णयाकडे लागले आहे.

# विष्णुपुरी अंडरपास दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करा ;दोषी कंपनीला ब्लॅकलिस्ट करा

## आ.आनंदराव बोंढारकर यांची केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी

नांदेड/प्रतिनिधी-राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ (तुळजापूरबट्टी बोरी) वरील लोहावारंगा मार्गखंडात विष्णुपुरी गावाजवळील वाहन अंडरपासची रिटेनिंग वॉल कोसळल्याच्या गंभीर घटनेची उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करण्यात यावी. तसेच निकृष्ट दर्जाच्या कामासाठी जबाबदार असलेल्या मेसर्स के.टी.आय. एल. या बांधकाम संस्थेविरुद्ध कठोर कारवाई करून तिला तात्काळ काळ्या यादीत टाकण्यात यावे, अशी ठाम मागणी नांदेड दक्षिणचे आ.आनंदराव बोंढारकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात आज दिल्लीत आ.बोंढारकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. या भेटीत दिलेल्या निवेदनात सार्वजनिक निधीतून उभारण्यात आलेल्या महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये दर्जाहीन कामकाज होत आहे. विष्णुपुरी येथील अंडरपासच्या रिटेनिंग वॉल कोसळल्याने बांधकामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून या प्रकरणाची निष्पक्ष आणि उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. अशी मागणी करतानाच , नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्ते व पुलांच्या कामांना केंद्रीय मार्ग निधी योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता देऊन आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून देण्याचीही त्यांनी मागणी केली आहे.आ. बोंढारकर यांनी प्रमुख जिल्हा मार्ग (एमडीआर) - २८ वरील कारखाना - सायाळ-पारडी पोखर-भोसी मार्गावर कि. मी. ०/५०० ते १/५०० दरम्यान नवीन पुलाचे बांधकाम.राष्ट्रीय महामार्ग-३६१ ते मुसलमानवाडी-पिपळगाव-शेवडी-धानोरा-माळाकोळी मार्गावरील भणगी गावाजवळ मोठ्या पुलासह जोडरस्त्याचे बांधकाम करावे. मुसलमानवाडी - जुना कल्हाळ-विष्णुपुरी-पांगरी- असवदन-



गोपालचावडी-किकी- राहेगाव (एमडीआर-२९) मार्गाचे सुदृढीकरण तसेच किकी गावाजवळ मुख्य पुल व जोडरस्त्याचे बांधकाम करावे अशी मागणी त्यांनी केली आहे.या सर्व विकासकामांना मंजुरी मिळाल्यास नांदेड दक्षिण मतदारसंघातील ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सुरक्षित, वेगवान व सुलभ होईल. तसेच शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास आ. आनंदराव बोंढारकर यांनी व्यक्त केला आहे.

### शिवराम लुटे यांचा सत्कार

नांदेड/प्रतिनिधी-जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नांदेडच्या संचालकपदी शिवराम लुटे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने आज त्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात आयोजित कार्यक्रमात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते शिवराम लुटे यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी कुलगुरूंनी त्यांचे अभिनंदन करत नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदावरील भावी कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

नांदेड/प्रतिनिधी-माथाडी व सुरक्षा रक्षक भरती प्रक्रिया कॅम्प्युटर बेस्ड आयोजीत ऑनलाईन परीक्षा बुधवार २९ ते ३० जुलै २०२७ पर्यत सकाळी ९ ते सायं.७ या कालावधीत आयऑन डिजिटल झोन आयडीझेड एसएसएस. इंदिरा इंस्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी विष्णुपूरी गेट नं. १८ २२ नांदेड तसेच श्री संभाजी कॉलेज ऑफ प्रायमरी शामल इज्युकेशनल कॅम्प देगाव रोड पोस्ट नांदला डिग्रस खडकुत या परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. या परीक्षा केंद्राच्या परिसरात बाहेरील व्यक्तीचा उपद्रव होवू नये म्हणून तसेच सदर परीक्षा ही स्वच्छ सुसंगत वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने नांदेड पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये आदेश निर्गमित केला आहे.

या परीक्षा केंद्रापासून १०० मिटरच्या परिसरात २९ ते ३० जुलै रोजी पर्यंत स. ८ ते रात्री ८ वाजेपर्यतच्या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी याव्यक्तीरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. तसेचपरीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी, कर्मचारी याव्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप इ. तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या १०० मिटर पर्यंत परिसरात वापरण्यास, जवळ बाळगण्यास तसेच परीक्षाकेंद्रात नेण्यास, त्याचप्रमाणे वर दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील १०० मिटर पर्यतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एस.टी.डी.,आय.एस. डी., भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास या आदेशाद्वारे प्रतिबंध करण्यात आले आहे. हा आदेश २८ जुलै रोजी रोजी निर्गमीत केला आहे.



नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ.प्रवीण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पुस्तक भेट देऊन अभिष्टचिंतन करताना स.नवनिहालसिंगजी जहागीरदार, भाकप जिल्हा सचिव कॉ.शिवाजी फुलवळे, राज्य कौन्सिल सदस्य कॉ.देवराव नारे, कोषाध्यक्ष कॉ.गणेश संदुपटला आदी दिसत आहेत.

# लिपिक संघटनेच्या संवाद बैठकीत कर्मचाऱ्यांना दिलासा ;एस-१४ एकत्रीकरणाचा निर्णय लवकरच

नांदेड/प्रतिनिधी-जिल्हा परिषद नांदेड येथे महाराष्ट्र राज्य जि.प. लिपिक कर्मचारी ६१५ संघटना शाखेची संवाद बैठक उत्साहात पार पडली. बैठकीस संघटनेचे राज्याध्यक्ष सागर बाबर, राज्य कार्याध्यक्ष पंकज गुल्हाणे, विभागीय अध्यक्ष अशोक कासराळीकर, विभागीय कार्याध्यक्ष संजय जगताप तसेच जिल्हाध्यक्ष कमल दर्डा उपस्थित होते.

कारगिल शहीदांना श्रद्धांजली अर्पण करून बैठकीची सुरुवात करण्यात आली. राज्याध्यक्ष सागर बाबर यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना कनिष्ठ प्रशासन अधिकारी व सहाय्यक प्रशासन अधिकारी ही पदे एस-१४ मध्ये एकत्र करण्याबाबतचा शासन निर्णय लवकरच होईल, तसेच या प्रक्रियेत कोणत्याही लिपिकाचे आर्थिक नुकसान होणार नसल्याची ग्वाही दिली.बैठकीत वेतनत्रुटी, पदोन्नती, प्रलंबित प्रश्न आणि आगामी सांगली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय लिपिक अधिवेशनाच्या तयारीवर चर्चा झाली. यावेळी संतोष दासरवाड, आनंद सावंत, गजानन शिंदे, ज्ञानेश्वर वानखेडे, रवी कांबळे, विजय थोरात, अद्वैत देशपांडे, ओंकार पांचाळ, गिरीश जोशी यांच्यासह जिल्ह्यातील शंभरहून अधिक पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार संघटनेचे उपाध्यक्ष अनिल नरंगलकर यांनी मानले.

# बहिणाबाईंच्या कवितांनी रसिकांना घडविली वऱ्हाडी मुलखाची शब्दसफर

## सीए डॉ.प्रवीण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त हृदयस्पर्शी काव्यवाचन

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सायन्स कॉलेज, नांदेडच्या सांस्कृतिक विभागातर्फे आयोजित करण्यात आलेला कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचा काव्यवाचन कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावपूर्ण वातावरणात पार पडला. मराठी साहित्यातील ग्रामीण जीवनाचा अस्सल गंध जपणाऱ्या बहिणाबाईंच्या कवितांनी उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापक आणि साहित्यप्रेमींना अक्षरशः मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा. लक्ष्मण शिंदे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट करत बहिणाबाईंच्या साहित्याचा परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी डॉ. प्रिता बोरकर आणि डॉ. रेखा वाडेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. बहिणाबाई चौधरी यांच्या निवडक कवितांचे प्रभावी वाचन डॉ. विभाती कुलकर्णी, डॉ. संगीता मोदी, डॉ. अरुणा शुक्ला आणि राहुल भगत यांनी केले. त्यांच्या प्रभावी आवाजातून बहिणाबाईंच्या कवितांतील ग्रामीण जीवन, कष्टकरी संस्कृती, निसर्गप्रेम आणि जीवनतत्त्वज्ञान जिवंत झाले. तर स्नेहा गायकवाड यांनी अभिनयाच्या माध्यमातून कवितांतील भावविश्व इतक्या प्रभावीपणे साकारले की, सभागृहातील प्रत्येक श्रोता भारावून गेला. त्यांच्या सादरीकरणामुळे उपस्थितांना जणू वऱ्हाडी मुलखातील गावागावांत फिरत असल्याचा अनुभव आला. कार्यक्रमाचे सुरेख आणि ओघवते सूत्रसंचालन कु. जान्हवी गव्हाणे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. एकनाथ खिल्लारे यांनी आभार मानले. या प्रसंगी नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सचिव प्रा. श्यामल पत्की, कॉलेज विकास समितीचे चेअरमन दीपनाथ पत्की, संस्थेचे सहसचिव ॲड. कॉ. प्रदीप नागापूरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सभागृहात विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान प्रत्येक कवितेला उत्स्फूर्त दाद मिळत होती. बहिणाबाईंच्या साध्या, सरळ पण जीवनाचे गूढ उलगडून दाखविणाऱ्या कवितांनी उपस्थितांना अंतर्मुख केले. सीए डॉ. प्रवीण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित हा उपक्रम केवळ साहित्यिक कार्यक्रम न ठरता मराठी भाषेचा, ग्रामीण संस्कृतीचा आणि बहिणाबाई चौधरी यांच्या अजरामर काव्यसंपदेचा एक संस्मरणीय उत्सव ठरला. उपस्थितांनी अशा दर्जेदार साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन सातत्याने व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.


CHANGE IN NAME

My old name is **SYEDA SARA GAZAL SYED MOHIUDDIN** which now I am changing As new name **SARA GAZAL IMRAN BA AMAR** my all correspondance Will be done As my new name please consider the same.

Address
Near ameer hamza masjid
Barkat pura waghi Road Nanded.
Mob.9665250247

CHANGE IN NAME

My old name is **ABDUL AYFAN ABDUL RAHEMAN** which now I am changing **AYFAN ABDUL REHMAN BA AMAR** As new name my all correspondance Will be done As my new name please consider the same.

Address
Near ameer hamza masjid
Barkat pura waghi Road Nanded.
Mob.8983838033


जे- /सोसा/२२३८/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग,नांदेड
दिनांक - २७/०७/२०२६

## चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक १२७९/२६ कलम १९

सार्वजनिक न्यासाचे नांव : अल-नुर वेलफेअर ॲन्ड एज्युकेशन सोसायटी,नांदेड ता.जि.नांदेड

अर्जदार नांव : मोहम्मद अल्ताफ हुसैन

सर्व संबधित लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड, विभाग नांदेड हे वर नमुद केलेल्या अहवाल अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१. वर नमुद केलेला सार्वजनिक न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२. खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीचा आहे काय?

अ) जंगम मिळकत (वर्णन) : अर्जदार यांच्याकडे सभासद फी रुपये १०५७/- जमा आहेत.

ब) सदर मिळकत (वर्णन) :

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देण्याचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत हि नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखे पासून तीस दिवसाच्या आत या कार्यालयाच्या पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाच्या निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जाईल.

ही नोटीस माझ्या सहीनिशी व मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड यांचे शिक्यानिशी आज दिनांक २७/०७/२०२६ रोजी दिली.

स्वाक्षरित/-
**(श्रीरामे बि.एन.)**
**वरिष्ठ लिपिक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,नांदेड विभाग नांदेड

स्वाक्षरित/-
**(एस.आर.रावते)**
**प्र. (अधिक्षक)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,नांदेड विभाग नांदेड

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ५ वे सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड यांच्या न्यायालयात
समक्ष एम.आर.कायस्थ सह.दि. न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.९७९/२०२६

१. संध्या भ्र.राजाराम शिरगीरे वय ५४ वर्ष धंदा घरकाम रा.प्लॉट न.बी वन मालेगाव रोड छत्रपती शिवाजीनगर तरोडा खू.नांदेड, २. सूजाता भ्र.नारायण पेदे सूजाता पि.राजाराम शिरगीरे वय ३७ वर्ष धंदा घरकाम रा.शेळगाव छत्री पो.कोकलेगाव ता.नायगाव खैरगाव जि.नांदेड, ३. सूमिता भ्र.राजू अकोले सूमिता पि.राजाराम शिरगीरे वय ३२ वर्ष धंदा घरकाम रा.इंजेगाव पो.शिनगरवाडी ता.किनवट जि.नांदेड

विरूध्द

निल

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअथी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअथी अर्जदार व गैरअर्जदार मयत राजाराम पि.रामचंद्र शिरगीरे यांचे वारस आहेत मयत राजाराम पि.रामचंद्र शिरगीरे यांचा मृत्यू दिनांक २१/०२/२०२६ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार व गैरअर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक २४/०८/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २०/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**क.लिपीक**
५ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**स.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

जा.क्र.नांवाशमनपा/क्षे.का.०१/नापवि/८७०/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : २१-७-२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.NT/०१/१४३३५/क्षे.का.क्र.१ तरोडा-सांगवी**

**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **सौ.छाया सुधाकर राठोड** रा.**तरोडा खु.**,नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ.पत्र क्र.**१०५१/०९ दि.३०/१०/२००९ तरोडा खु.** गट नं.**१७३ पैकी प्लॉट क्रं.१०० भाग पिन क्र.४०११२०४०७७९** सौ. **जयक्षी भ्र.अशोकराव खिल्लारे** यांच्या नावे असलेली मालमत्ता यांचेकडुन अर्ज **खरेदीखत क्र.५२५२ दि.०३/०६/२०२६** च्या आधारे विकत घेतली आहे/वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आकारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमत्ता नोंदविण्यात येईल.

**चर्तुःसिमाः- पुर्व**- गट नं.१७३ चा भाग आहे, **पश्चिम-** ६.१० मी. रुंद रोड आहे, **दक्षिण-**प्लॉट क्र.१०० चा भाग आहे, **उत्तर-**प्लॉट क्र.९९ आहे.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त**
क्षे.का.क्रं.०१ तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२६३/२०२६
(CNR No.MHND100008872026)

अर्जदार - १) जनाबाई भ्र.भगवान राठोड वय २६ वर्षे, धंदा-घरकाम, २) मंगेश पि.भगवान राठोड वय ०८ वर्षे, धंदा-शिक्षण, ३) दिव्या पि.भगवान राठोड वय ०६ महीने, धंदा-शिक्षण, अ.पा.क.अर्जदार क्र.२ व ३ हे अर्जदार क्र.१ चे नामे जनाबाई राठोड आहे. रा.घागरदरा ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ व ३ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ ही पत्नी व २ व ३ ही मूले आहेत. अर्जदार क्र.१ चे पती, २ व ३ चे वडील नामे भगवान गंपू राठोड हे होते ते दिनांक २०/०५/२०२६ मयत झाले आहेत. वरील अर्जदाराचे म्हणणे आहे की, मयत भगवान गंपू राठोड यांचे अर्जदारांशिवाय इतर कोणीही वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत भगवान गंपू राठोड यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत भगवान गंपू राठोड यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२९/०८/२०२६

आज रोजी दि.२३/०७/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

# देगलूर येथील उपजिल्हा रुग्णालयात ८९.७० लाखांचा अपहार

## वैद्यकीय अधीक्षकांसह ५ कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

देगलूर/प्रतिनिधी-येथील उपजिल्हा रुग्णालयातील शासकीय निधीतून तब्बल ८९ लाख ७० हजार १५० रुपयांचा अपहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश अंबादासराव देवणीकर यांच्यासह ४ कर्मचाऱ्यांविरुद्ध देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लातूरचे उपसंचालक, आरोग्य सेवा यांच्या चौकशीनंतर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा रजिस्टर क्रमांक २५९/२०२६ नोंदविण्यात आला आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी सेवार्थ प्रणालीमध्ये बेकायदेशीरपणे वेतन आणि बेसिक एरिअर्सची नोंद करून बनावट देयके तयार केली. ती सहाय्यक कोषागार कार्यालयात सादर करून संबंधित कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात रक्कम वर्ग केली.या अपहारात वरिष्ठ लिपिक रावसाहेब रामकिशन मोरे यांनी ३० लाख ३८ हजार १५० रुपये, प्रयोगशाळा सहाय्यक दिगंबर आनंदराव मोरे यांनी १७ लाख ३१ हजार ७५० रुपये, पुरुष अधिकारीचारिका शिवाजी मारोती पवार यांनी १८ लाख ९० हजार २५० रुपये आणि कनिष्ठ लिपिक माधव किशन मगर यांनी ३ लाख ५० हजार रुपये आपल्या खात्यात जमा करून घेतले. या सर्वांवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१६(५), ३१८(२), ३३६(२), ३८ व ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास देगलूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड करत आहेत. या घटनेमुळे देगलूर तालुक्यातील आरोग्य यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शासकीय रुग्णालयातीलच अधिकाऱ्यांनी असा घोटाळा केल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे.

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात पीक विम्याची रक्कम तात्काळ जमा करा

## खा.रवींद्र चव्हाण यांचा आंदोलनाचा इशारा



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील ५७ हजारांहून अधिक शेतकरी पीक विम्यापासून वंचित आहेत. ७८.५१ कोटींचे दावे प्रलंबित, पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा करावी अन्यथा आंदोलनाशिवाय पर्याय नाही असा सज्जड इशारा खा.रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी दिला आहे.पिक विम्याची रक्कम अद्यापही न मिळाल्याने खा.चव्हाण यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजना (खरीप २०२५-सोयाबीन उत्पादन आधारित दावा) अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील हजारो शेतकरी आजही पीक विम्याच्या प्रतीक्षेत आहेत. उपलब्ध अधिकृत आकडेवारीनुसार जिल्ह्यातील १४ महसूल मंडळांतील ५७,०६४ शेतकऱ्यांचे ७८.५१ कोटींचे पीक विमा दावे अद्याप प्रलंबित असून, विमा वितरणासाठी आवश्यक असलेला राज्य शासनाचा हिस्सा न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना अद्याप एकही रुपया मिळालेला नाही.या गंभीर प्रश्नावर खा.रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी आक्रमक भूमिका घेत राज्य शासन, कृषी विभाग आणि संबंधित विमा कँम्पनीला जाब विचारला आहे. शेतकऱ्यांच्या खात्यात मंजूर विम्याची रक्कम तातडीने जमा करावी, अन्यथा हा प्रश्न संसदेसह राज्य शासनाच्या स्तरावरही लावून धरू, असा इशाराही त्यांनी दिला आहे.अधिकृत अहवालानुसार जिल्ह्यातील ५७,०६४ शेतकऱ्यांनी ४१,०२३.७८ हेक्टर क्षेत्रासाठी विमा अर्ज केला होता. त्यापैकी ७८.८४ कोटींचा दावा मंजूर झाला असला, तरी आजपर्यंत प्रत्यक्षात कोणत्याही शेतकऱ्याच्या खात्यात रक्कम जमा झालेली नाही. तब्बल ७८.५१ कोटींचे दावे अद्याप प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे.जेव्हा पात्र शेतकऱ्यांचे दावे मंजूर झाले आहेत, तेव्हा राज्य शासनाचा हिस्सा देण्यास विलंब का होत आहे? असा सवाल उपस्थित करून खा.रवींद्र चव्हाण यांनी हजारो शेतकऱ्यांना त्यांचा हक्काचा पीक विमा नेमका कधी मिळणार? शासनाने या विलंबामागील कारणे स्पष्ट करून तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी त्यांनी मागणी केली.दरम्यान, खा.रवींद्र चव्हाण यांनी शासनाच्या या दिरंगाईवर तीव्र नाराजी व्यक्त केली असून, प्रलंबित पीक विमा तातडीने वितरित न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे. आता राज्य शासन राज्याचा दावा हिस्सा कधी जमा करते आणि नांदेड जिल्ह्यातील ५७ हजारांहून अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात ७८.५१ कोटींचा पीक विमा कधी जमा होतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# पावसाच्या दोन सरी...आणि माहूर अंधारात!,महावितरणच्या मेंटेनन्सचा पैसा गेला कुठे?

## 'जिल्हाधिकाऱ्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावून हिशेब मागावा'

माहूर/प्रतिनिधी- पावसाच्या केवळ दोन-चार सरी कोसळल्या की माहूर शहराचा व तालुक्यातील वीजपुरवठा कोलमडतो, हे आता नित्याचेच झाले आहे. अनेक गावांमध्ये पाच-पाच, सहा-सहा तास वीज गायब असते, तर काही ठिकाणी नागरिकांना संपूर्ण रात्र अंधारात काढावी लागते. महावितरण दरवर्षी पावसाळी पूर्वतयारीचा दावा करते, मात्र प्रत्यक्षात पहिल्याच पावसात त्याचे पितळ उघडे पडत आहे.

डीपीडीसी, शासन आणि महावितरणकडून दरवर्षी देखभाल व दुरुस्तीसाठी लाखो रुपयांचा निधी उपलब्ध होतो. मग हा निधी नेमका खर्च कुठे झाला? लोचकळणाऱ्या विद्युत तारा, उघड्यावरचे ट्रान्सफॉर्मर, वेळेवर न होणारी दुरुस्ती आणि सततचा खंडित वीजपुरवठा पाहता हा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिक विचारू लागले आहेत.अवघ्या पंधरा दिवसांपूर्वी ग्रामीण रुग्णालयाला वीजपुरवठा करणारा ट्रान्सफॉर्मर जळाला होता. त्याऐवजी नवीन ट्रान्सफॉर्मर बसवण्यासाठी तब्बल ४८ तासांचा कालावधी लागला. एवढ्या महत्त्वाच्या ठिकाणीही तातडीची व्यवस्था नसल्याने रुग्णालयासह नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.याहून धक्कादायक बाब म्हणजे माहूर व वाई बाजार उपकेंद्रात आपत्कालीन परिस्थितीसाठी अतिरिक्त ट्रान्सफॉर्मरच उपलब्ध नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे एखादा ट्रान्सफॉर्मर जळाला की संपूर्ण परिसर अंधारात जातो आणि नागरिकांना दिवसन्‌दिवस प्रतीक्षा करावी लागते. अनेक डीपींवर साधी फ्यूज वायरही उपलब्ध नसून तात्पुरत्या जोडण्या करून काम भागवले जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. त्यामुळे पावसाळ्यात मोठ्या अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही. देखभालीसाठी नियुक्त एजन्सी, कामांची बिले आणि प्रत्यक्षात झालेली कामे यांची सखोल चौकशी करण्याची मागणी आता जोर धरत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी महा-वितरणच्या सर्व अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांची तातडीने बैठक बोलावून मेंटेनन्ससाठी आलेल्या निधीचा हिशेब सार्वजनिक करावा. कोणत्या कामावर किती खर्च झाला, कोणत्या एजन्सीला कामे देण्यात आली आणि प्रत्यक्षात किती कामे पूर्ण झाली, याची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी तीव्र मागणी नागरिकांकडून होत आहे.

# आरक्षण उपवर्गीकरण समर्थनार्थ जनआक्रोश मोर्चा

हदगाव/प्रतिनिधी-सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती (एससी) आरक्षणांतर्गत उपवर्गीकरण करण्यास दिलेल्या निकालानुसार राज्यात तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी, या मागणीसाठी हदगाव तालुक्यातील सकल मातंग समाज बांधवांच्या वतीने २८ रोजी हदगाव तहसील कार्यालयावर भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. अनुसूचित जाती प्रवर्गात उपवर्गीकरण करावे, या मागणीसाठी काढण्यात आलेल्या या जनआक्रोश मोर्चात शहरासह नांदेड जिल्हाभरातून मातंग समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.याप्रसंगी प्रा. रामचंद्र भराडे म्हणाले की, राज्य सरकारने तातडीने उपवर्गीकरण करावे, अन्यथा येत्या १ ऑगस्टपासून महाराष्ट्रात मंत्र्यांना फिरू देणार नसल्याचा इशारा त्यांनी या वेळी दिला.यावेळी माजी आ.नामदेव ससाणे, प्रा. रामचंद्र भराडे, गणपत भिसे, के. मूर्ती, विजय रणखांब, मच्छींद्र गव्हाले, गुणवंत काळे, बालाजी गायकवाड, वि. मा. सिरसाट, उत्तमजी बांभळे, धोंडुपंत बनसोडे, बाळासाहेब टिक्कर, दत्तात्रय काळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.आंदोलनानंतर तहसीलदारांमार्फत शासनाला निवेदन देण्यात आले. या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या वतीने कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# लंडनस्थित कुंडलवाडीचे डॉ.नागराज कोंडावार नायर हॉस्पिटलच्या वैज्ञानिक परिषदेत विशेष वक्ते



कुंडलवाडी/प्रतिनिधी-मुंबईतील प्रतिष्ठित नायर हॉस्पिटल डेंटल कॉलेजच्या वैज्ञानिक समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'ओडोन्टोसेप्शन-२०२६' या दोन दिवसीय वैज्ञानिक, करिअर मार्गदर्शन व कौशल्य विकास परिषदेसाठी कुंडलवाडीचे भूमिपुत्र तथा सध्या लंडन येथे कार्यरत असलेले डॉ. नागराज शंकर कोंडावार यांना विशेष वक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. त्यांच्या या निवडीमुळे कुंडलवाडीसह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

ही परिषद ३० जुलै रोजी सकाळी ९.३० ते दु.१२.३० या वेळेत नायर हॉस्पिटल डेंटल कॉलेज, मुंबई येथे होणार असून, त्यामध्ये पदवी व पदव्युत्तर दंतवैद्यकीय विद्यार्थ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग अपेक्षित आहे.परिषदेत वैज्ञानिक शोधनिबंध व पोस्टर सादरीकरण, तज्ज्ञांची व्याख्याने, करिअर मार्गदर्शन, विविध विषयांवरील चर्चासत्रे तसेच प्रत्यक्ष प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, नैदानिक कौशल्य वृद्धिंगत करणे आणि शैक्षणिक संवादाला चालना देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे.दंतचिकित्सा क्षेत्रातील आपल्या समृद्ध अनुभवाच्या आधारे डॉ. नागराज कोंडावार विद्यार्थ्यांना आधुनिक दंतवैद्यकीय क्षेत्रातील संशोधन, जागतिक संधी, कौशल्य विकास आणि करिअरच्या विविध वाटांबाबत मार्गदर्शन करणार आहेत. त्यांचे व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आणि दिशादर्शक ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.या निमंत्रणाच्या माध्यमातून डॉ. नागराज कोंडावार यांच्या शैक्षणिक, व्यावसायिक आणि दंतवैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची पुन्हा एकदा दखल घेण्यात आली आहे. कुंडलवाडीच्या भूमिपुत्राला मुंबईतील प्रतिष्ठित नायर हॉस्पिटल डेंटल कॉलेजच्या वैज्ञानिक परिषदेसाठी विशेष वक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आल्याने कुंडलवाडीकरांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.डॉ. नागराज कोंडावार हे कुंडलवाडी येथील सेवानिवृत्त शिक्षक तथा ज्येष्ठ पत्रकार शंकर कोंडावार यांचे सुपुत्र असून, त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर दंतचिकित्सा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून आपल्या गावाचे व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

# अनुदानित युरिया खताची बेकायदेशीर परराज्यात वाहतूक उधळली

## धर्माबाद येथे टेम्पोसह ९ लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड/प्रतिनिधी-शेतकऱ्यांसाठी शासनामार्फत अनुदानित दराने उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या युरिया खताची बेकायदेशीररीत्या परराज्यात वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कृषी विभागाच्या जिल्हा भरारी पथकाने धडक कारवाई करत टेम्पोसह ९ लाख ४० हजार ३१५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी धर्माबाद पोलीस ठाण्यात संबंधितांविरुद्ध विविध कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा भरारी पथक प्रमुख तथा मोहीम अधिकारी सचिन कपाळे व जिल्हा भरारी पथक सचिव अमोल पेकम यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, शेतकऱ्यांसाठी राखीव असलेला अनुदानित युरिया खताचा मोठा साठा विनापरवाना व बेकायदेशीर मार्गाने तेलंगणा राज्याच्या दिशेने वाहतूक केला जात असल्याची माहिती प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे जिल्हा भरारी पथकाने कृषी अधिकारी (गुण नियंत्रण), धर्माबाद यांच्या सहकार्याने सापळा रचून संशयित टेम्पो अडवून तपासणी केली.तपासणीदरम्यान टेम्पोमध्ये कोणतेही वैध परवाने अथवा आवश्यक कागदपत्रांशिवाय शासकीय अनुदानित युरिया खताची पोती आढळून आली. त्यानंतर कृषी विभागाने तात्काळ कारवाई करत संपूर्ण खतसाठा व वाहतुकीसाठी वापरण्यात आलेला टेम्पो जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या खतसाठा व वाहनाची एकूण किंमत ९ लाख ४० हजार ३१५ असून सदर मुद्देमाल पुढील कायदेशीर कारवाईसाठी धर्माबाद पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे.याप्रकरणी कृषी विभागाचे गुण नियंत्रण निरीक्षक विशाल चंदापुरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून धर्माबाद पोलीस ठाण्यात खत नियंत्रण आदेश, १९८५, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.शेतकऱ्यांच्या हक्काचे अनुदानित खत काळ्या बाजारात विक्रीसाठी परराज्यात पाठविण्याचा प्रयत्न कृषी विभागाने वेळेत हाणून पाडल्याने या कारवाईचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा पुढील तपास धर्माबाद पोलीस करीत आहेत. सदर कारवाई जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, संचालक निवगुणी बोरकर, विभागीय कृषी सहसंचालक महेश तीर्थकर, मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी प्रवीण देशमुख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत तसेच कृषी विकास अधिकारी डॉ. नीलकुमार ऐतवडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

पान १ वरुन

### विद्यार्थ्यांवर कारवाईचे आदेश...

व्यवस्थेतील त्रुटी आणि दिवसाला आठ ते दहा तास अभ्यास करूनही न्याय मिळत नसल्याची वेदना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्याचे त्यांनी सभागृहात सांगितले.याचवेळी भाजप सदस्यांनी राहुल गांधी यांनी गृहमंत्रालयावर केलेल्या आरोपांचे पुरावे द्यावेत किंवा सभागृहाची माफी मागावी, अशी ठाम भूमिका घेतली. त्यानंतर सभागृहात जोरदार गदारोळ झाला.

### कोळसा खाण प्रकरणात...

विशेष न्यायालयाने समन्स जारी केले होते. मात्र सर्वोच्च न्यायालयाने सर्व याचिकांवर अंतिम निर्णय देत सीबीआयचा क्लोजर रिपोर्ट स्वीकारला आणि डॉ. मनमोहन सिंग यांना कोळसा खाण वाटप प्रकरणातील आरोपांतून पूर्णपणे दोषमुक्त केले.

पान १ वरुन

### मांडवी रुग्णालयातील...

यांनी १५ जुलै २०२६ रोजी पत्राद्वारे या संशयास्पद व्यवहाराची माहिती दिल्यानंतर उपसंचालक आरोग्य सेवा लातूर यांच्यामार्फत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली. चौकशीत डॉ.विक्रम राठोड यांनी शासकीय रक्कमेचा अपहार केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर उपसंचालक आरोग्य सेवा लातूर यांच्या आदेशानुसार, नांदेडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय पेरके यांनी मांडवी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर मांडवी पोलिसांनी डॉ.राठोड यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१३(५), ३१८(२), ३३६(२) आणि ३३८ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक गंगाधर नामदेवराव गायकवाड करीत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### कुणबी प्रमाणपत्रासाठी...

भासत नसली, तरी भविष्यात त्यांनाही त्याची आवश्यकता भासू शकते. त्यामुळे समाजाच्या न्याय्य मागण्यांच्या पाठीशी उभे राहा, असे आवाहन त्यांनी केले.मराठा समाजाच्या प्रश्नांसाठी स्वतंत्र मराठा मंत्रालय स्थापन करण्याची मागणी करत उपसमित्यांच्या बैठका घेऊन प्रश्न सुटणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, मराठा समाजाच्या मागण्यांना विरोध करणाऱ्या नऊ मंत्र्यांची नावे २९ ऑगस्ट रोजी जाहीर करणार असल्याचा दावाही त्यांनी केला. आगामी आंदोलन अधिक तीव्र आणि व्यापक स्वरूपात होणार असल्याचे संकेत त्यांनी यावेळी दिले.

### मांडवीतील ग्रामीण रुग्णालयाची...

कोणत्याही रुग्णाची वैद्यकीय उपचारात हेळसांड होऊ नये, यासाठी त्यांनी विशेष निर्देश दिले आहेत.रुग्णालयात डॉक्टरांची उपस्थिती, औषध साठा आणि गोळ्यांची पुरेशी उपलब्धता राहील, याची ग्वाही देत नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये व आरोग्य सेवेबाबत निर्धास्त राहावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# माजी सरपंच नागोराव डांगे यांचे निधन

उस्माननगर/प्रतिनिधी-कंधार तालुक्यातील मौजे उस्माननगर येथील शिस्तबद्ध माजी सरपंच तथा सेवानिवृत्त सपोनि नागोराव संभाजी डांगे यांचे आज वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९० वर्षाचे होते. त्यांच्यावर उद्या गुरुवारी येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



कै. नागोराव संभाजी डांगे यांच्या कार्यकाळात उस्माननगर येथे पाणीटंचाई काळात नागरिकांना पाणी टंचाई दुर करण्यासाठी टँकर, व पाणीपुरवठा योजनेसाठी सतत पाठपुरावा करून योजना मंजूर करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. येथील दिवापत्ती, घरकुल, रस्ते अदी विकासाची कामे केली आहेत.माजी सरपंच तथा सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस निरीक्षक नागोराव संभाजी डांगे यांच्या वृध्पकाळाने निधन झाल्यानंतर डांगे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यांच्या पश्चात सपोउपनि (बाळु) (बालासाहेब) बालाजी डांगे व शाखा अभियंता हिमायतनगरचे बाबू (मारोती) डांगे हे दोन मुल व दोन मुली, नात उपजिल्हाधिकारी पुणे येथील सुप्रिया डांगे, व पणतू असा परिवार आहे.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २९/०७/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार हिवरे सुनील सटवाराव रा.बहाद्दरपुरा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा मुलगा श्री.हिवरे वैद्विक सुनिल रा.बहाद्दरपुरा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव हिवरे वैद्विक सुनिल रा.बहाद्दरपुरा ता.कंधार या ठिकाणी दिनांक ३०/०७/२०२४ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २९/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २९/०७/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार सयद फेरोज सलीम रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.सयद फेरोज सलीम रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव सयद फेरोज सलीम रा.कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक १४/०४/१९८६ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २९/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४